ePaper

# पंतप्रधानांच्या कार्यक्रमात अजितदादा गटाला होर्डिंगवर मानाचे स्थान



| वर्ष - 7 | अंक - 244 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 13 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- सूर्यकुमार पुनरागमन करणार!
- कंगनाचा बिल्किस बानोवर चित्रपट?
- डिसेंबरमध्ये महागाईचा दर वाढला!
- गोगावलेंचा व्हीप आम्हाला लागू नाही


## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची बदली?

# राष्ट्रवादीशी पंगा पडा महंगा!

### तडकाफडकी बदली होणार : सुहास दिवसे किंवा राजेश देशमुख यांच्या नियुक्तीची शक्यता

। पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची तडकाफडकी बदली होणार असून, त्यांच्या जागी सुहास दिवसे किंवा राजेश देशमुख या दोघांपैकी एकाची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसा निर्णय झाला असून, कोणत्याही क्षणी सिंह यांना बदलीचा आदेश येवू शकतो, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळली आहे.**

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू म्हणून राजेश पाटील यांची पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तपदी वर्णी लावण्यात आली होती.

भाजपासाठी पाटील चांगलेच डोकेदुखी ठरले होते. त्यानंतर महायुतीच्या सत्ताकाळात पाटील यांची उचलबांगडी करण्यात आली आणि दि. १६ ऑगस्ट २०२२ रोजी शेखर सिंह यांची आयुक्तपदी नियुक्ती झाली होती.

शिवसेना आणि भाजपाच्या सत्ताकाळात शेखर सिंह यांनी विकासकामांचा धडाका लावला. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसह भाजपा विरोधकांच्या ते कायम रडारवर राहिले होते. इंटरनेट केबल डक्टींग, भामा आसखेड प्रकल्पातील जॅकवेलपासून वाकडमधील टीडीआरच्या कथित घोटाळ्यापर्यंत शेखर सिंह राष्ट्रवादीसह विरोधकांच्या टीकेचे धनी झाले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील अजित पवार गट 'महायुती'मध्ये सहभागी झाला. त्यानंतर पुण्याच्या पालकमंत्रीपदी अजित पवार यांची नियुक्ती झाली. त्यामुळे राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी शेखर सिंह यांच्या कार्यपद्धतीबाबत वारंवार तक्रारी केल्या. वाकडमधील टीडीआर प्रकरणामुळे सिंह यांच्याविरोधातील वातावरण शिगेला पोहोचले. त्यामुळे शेखर सिंह यांना ३ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्यापूर्वीच बदलीचा सामना करावा लागणार आहे.









### अजित पवार यांच्या मर्जीतील अधिकाऱ्याला संधी?

» दरम्यान, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मर्जीतील अधिकाऱ्याला पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तपदी नियुक्ती देण्यात येणार आहे, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. त्यानुसार, पुणे जिल्हाधिकारी राजेश देशमुख आणि राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाचे आयुक्त सुहास दिवसे या दोन बड्या अधिकाऱ्यांची नावे चर्चेत आहेत. डॉ. राजेश देशमुख हे २००८ च्या तुकडीतील अधिकारी असून, कॅबिनेट मंत्री व तत्कालीन विधान परिषद विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांचे खासगी सचिव म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. सातारा जिल्हाधिकारी असताना त्यांनी ७२ गावांचा कायापालट केला होता. तसेच, सुहास दिवसे हे २००५ च्या तुकडीतील अधिकारी आहेत. त्यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) चे आयुक्त म्हणून काम पाहिले आहे. सध्या ते राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयात आयुक्त म्हणून कर्तव्य बजावत आहेत. विशेष म्हणजे, हे दोन्ही अधिकारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मर्जीतील आहेत, असे बोलले जाते.

विशेष म्हणजे, शिवसेना, भाजपाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना आणि आमदार, खासदारांना विश्वासात न घेता आयुक्त शेखर सिंह यांची बदली करण्यात येत आहे. त्यामुळे सेना-भाजपाच्या गोटात नाराजी आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादीच्या दबावामध्ये बदली होत असेल आणि सेना-भाजपाची प्रशासकीय कोंडी होणार असेल, तर आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत आपल्याला ताकद कशी मिळणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# महागड्या गाड्या चोर टोळीचा पर्दाफाश!

### दिल्लीत गाड्यांची चोरी : महाराष्ट्रात बनावट कागदपत्रांद्वारे विक्री

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवडच्या दरोडा विरोधी पथकाने दिल्लीतून महागड्या चारचाकी चोरून महाराष्ट्रात विकणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश केला आहे. आरोपींकडून एकूण १ कोटी ५७ लाखांच्या ११ आलिशान गाड्या जप्त केल्या आहेत. आरोपी हे महाराष्ट्रातून दिल्लीला विमान प्रवास करायचे, मग तिथं इतर सहकारांच्या मदतीने महागड्या गाड्या चोरून त्या महाराष्ट्रात आणून बनावट कागदपत्रांद्वारे विकत असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे.**




यावप्रकरणी दरोडा विरोधी पथकाने दहा पैकी चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत. या गुन्ह्यात सांगली जिल्ह्यातील पोलीस शिपायाचा समावेश आहे. अजीम सलीम पठाण, शशीकांत प्रताष काकडे, राजराम उर्फ राजू तुकाराम खेडेकर, महेश भीमाशंकर सासवे, प्रशांत माने, विकास माने, भरत खोडकर, हाफिज, इलियास आणि रसूल शेख अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नाव आहे.

### दरोडा विरोधी पथकाची कारवाई...


» पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य आरोपी अजीम सलीम पठाण हा त्याचा साथीदार शशिकांत काकडे यांच्यासह दिल्लीत विमानाने जाऊन इतर सहकाऱ्यांच्या मदतीने महागड्या आणि आलिशान गाड्या चोरायचा. चोरलेली वाहने महाराष्ट्रात बनावट कागदपत्रे तयार करून विकत असल्याच उजेडात आले आहे. चाकण पोलीस ठाण्यामध्ये वाहनचोरी संबंधी एक गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी अजीम सलीम पठाण याला ताब्यात घेतलं. त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्याचा साथीदार शशिकांत काकडे याचं नाव पुढे आलं. हे दोघेही परराज्यात जाऊन महागड्या चार चाकी गाड्या इतर साथीदारांच्या मदतीने चोरत होते. अखेर याप्रकरणी आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश करण्यात दरोडा विरोधी पथकाला यश आलं आहे.

# शिवराजसिंह चौहान पुण्यात गरजले

## आजही मध्य प्रदेशातील जनता मला मामाच म्हणते

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आज मी माजी मुख्यमंत्री असलो, तरी नाकारलेला नाही. आजही मध्य प्रदेशातील जनता मला मामाच म्हणते. राजकारण केवळ पदासाठी नसते. मी राजकारणातून बाहेर पडलेलो नाही. अजून बरीच कामे बाकी आहेत, अशी ठाम भूमिका शिवराजसिंह चौहान यांनी मांडली. एमआयटी विश्वशांती विद्यापीठात आयोजित भारतीय छात्र संसद समारोप कार्यक्रमात चौहान बोलत होते.**




एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड या वेळी उपस्थित होते. दहावीत असताना केलेल्या पहिल्या आंदोलनापासूनच्या आठवणी सांगून शिवराजसिंह चौहान म्हणाले, की मध्य प्रदेशात १००० मुलांमागे ९१२ मुली इतके कमी प्रमाण होते. मुलगी म्हणजे कुटुंबावरील भार असे मानले जायचे. हे चित्र बदलण्यासाठी आम्ही मुलींचे विवाह करायला सुरुवात केली. मुख्यमंत्री झाल्यावर पहिली योजना लाडली लक्ष्मी योजना सुरू केली. मुलगी कुटुंबाला पैसे मिळवून देणारी ठरली. त्यामुळे मध्य प्रदेशात मुलींची संख्या वाढली. आज एक हजार मुलांमागे ९७६ मुली आहेत. मुलींनीच मला मामा म्हणायला सुरुवात केली. मला माझे आयुष्य सफल झाल्यासारखे वाटते. महिलांसाठी ५० टक्के आरक्षण दिले. १३ टक्के पदे महिलांसाठी पोलिसांमध्ये राखीव ठेवण्यात आली आहेत. लाडली बेहना योजनेची देशात चर्चा आहे. ही योजना म्हणजे रेवडी नाही. जनतेसाठी कल्याणकारी योजना आहे. अलीकडेच झालेल्या निवडणुकीवेळी राजकीय विश्लेषक म्हणत होते, भाजप निवडून येणार नाही. पण मी जिंकायंचच ठरवलं होतं. मात्र या निवडणुकीत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवला, तसंच आतापर्यंतची सर्वांत जास्त मतेही भाजपला मिळाली. २२ जानेवारीला श्रीराम मंदिराचे उद्घाटन होणार आहे. त्यामुळे इतक्या वर्षांच्या संघर्षानंतर आता रामलल्ला येतील आणि रामराज्यही येणार आहे, असेही शिवराजसिंह चौहान म्हणाले. स्वतंत्रपणे काम करायला मर्यादा आहेत. राजकारणात आल्याने मोठ्या स्तरावर काम करणे शक्य झाले. राजकारणात यायला घाबरू नका. राजकारण काय केवळ चोरी करणाऱ्यांचे आहे का, असा सवाल मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी उपस्थित केला. एमआयटी विश्वशांती विद्यापीठात आयोजित भारतीय छात्र संसद समारोप कार्यक्रमात चौहान बोलत होते. एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड यावेळी उपस्थित होते. तरुणांशी संवाद साधताना चौहान म्हणाले, की माझ्या मतदारसंघातून आतापर्यंत मी अकरा वेळा निवडून आलोय. मी माझ्या मतदारसंघात प्रचार करत नाही. राजकारणातील पैशाचा प्रभाव संपवण्यासाठी राजकारणात या. स्वतःला ओळखा. तुम्ही तुम्हाला हवे ते मिळवू शकता. स्वतंत्रपणे काम करायला मर्यादा आहेत. राजकारणात आल्याने मोठ्या स्तरावर काम करणे शक्य झाले. राजकारणात यायला घाबरू नका. राजकारण काय केवळ चोरी करणाऱ्यांचे आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान मामा या नावानेही ओळखले जातात. पुण्यात भारतीय छात्र संसदेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिवराजसिंह चौहान यांनी मामा होण्याची गोष्ट सांगितली.

### 'सीबीजी' निर्मिती करा

शिवराजसिंह चौहान म्हणाले, की मध्य प्रदेशात एक हजार मुलांमागे मुलांमागे ९१२ मुली इतके कमी प्रमाण होते. मुलगी म्हणजे कुटुंबावरील भार असे मानले जायचे. ही परिस्थिती बदलणे आवश्यक होते. त्यामुळे आम्ही मुलींचे विवाह करून देण्यास सुरुवात केली. तसेच मुख्यमंत्री झाल्यावर पहिली योजना आणली लाडली लक्ष्मी... या योजनेतून मुलींना वेगवेगळ्या टप्प्यावर पैसे देण्यात येऊ लागले. त्यामुळे मुलगीच कुटुंबाला पैसे मिळवून देणारी ठरली. गेल्या काही वर्षांत मध्य प्रदेशातील मुलींचे प्रमाण वाढले आहे. आज एक हजार मुलांमागे ९७६ मुली आहेत. मुलींसाठी उपयुक्त योजना सुरू केल्यामुळे मुलींनीच मला मामा म्हणायला सुरुवात केली. आईचा भाऊ म्हणजे मामा, मुलांवर आईसारखं प्रेम करतो तो मामा असतो. त्यामुळे मला माझे आयुष्य सफल झाल्यासारखे वाटते. लाडली बेहना योजनेची देशात चर्चा आहे. ही योजना म्हणजे रेवडी नाही. जनतेसाठी कल्याणकारी योजना आहे.

# इथेनॉलवर घातलेल्या निर्बंधांमुळे कारखाने अडचणीत

## इथेनॉलवरील निर्बंध तात्पुरते : नितीन गडकरी यांची माहिती

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर घातलेल्या निर्बंधांमुळे साखर कारखाने अडचणीत आले आहेत, याची जाणीव केंद्र सरकारला आहे. देशाच्या साखर उत्पादनात काहीशी तुट येण्याची शक्यता असल्यामुळे हे निर्बंध घालण्यात आले आहेत. पण, हे निर्बंध तात्पुरते आहेत. लवकरच निर्बंधांमधून दिलासा देण्यात येईल, असे स्पष्ट संकेत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.**



वसंतदादा शुगर इंस्टिट्यूटने (व्हीएसआय) आयोजित केलेल्या जागतिक साखर उद्योगातील शाश्वतता, आव्हाने आणि संधी, या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये ते बोलत होते. गडकरी यांच्या हस्ते तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्घघाटनही करण्यात आले. नितीन गडकरी म्हणाले, केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर घातलेल्या निर्बंधांमुळे साखर कारखाने अडचणीत आले आहेत, याची जाणीव केंद्र सरकारला आहे.

पण, हे निर्बंध तात्पुरते आहेत. इथेनॉल प्रश्नी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संपर्कात आहे. दीर्घकालीन इथेनॉल धोरणानुसार केंद्र सरकारकडून इथेनॉल उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची भूमिका कायम आहे. लवकरच इथेनॉल निर्बंधांबाबत दिलासा मिळेल. आता साखर कारखान्यांनी फक्त इथेनॉल उत्पादनावर थांबू नये. कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी), हरित हायड्रोजन आणि हरित विमान इंधन उत्पादनाच्या दिशेने गेले पाहिजे. पानिपतमध्ये भाताच्या पेंड्यापासून (भाताचे उर्वरीत कृषी अवशेष) कॉम्प्रेस्ड बायोगॅस आणि हरीत विमान इंधन उत्पादन करण्यात यश आले आहे. आता साखर कारखान्यांनी कारखान्यांनी कचरा, सांडपाणी, मळीसह सर्व प्रकारचा कृषी कचरा आणि शहरी कचऱ्यापासून इथेनॉलसह सीबीजी, हरित हायड्रोजन आणि विमान इंधन निर्मिती करण्याकडे वळावे. केंद्राच्या हरीत हायड्रोजन धोरणांअर्गत सहकार्याची भूमिका घेतली जाईल, असेही गडकरी म्हणाले. केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादन धोरणानुसार देशात फक्त इथेनॉलचे ३०० पंप सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे आता देशभरातील साखर कारखान्यांनी पेट्रोल-डिझेल पंपाच्या बरोबरीने इथेनॉल पंप सुरू करता येतील. आसाममध्ये बांबूपासून इथेनॉल निर्मितीचा प्रयोग यशस्वी झाला असून, उत्पादित झालेले इथेनॉल बांगलादेशाला निर्यात केले जात आहे. लवकरच देशातील रस्त्यांवरून पूर्णपणे इथेनॉल आणि हरित हायड्रोजनवर चालणाऱ्या गाड्या धावतील, असेही गडकरी म्हणाले. साखर उद्योगामुळे पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला आहे.

### देशात इथेनॉलचे 300 पंप होणार

देशाच्या साखर उत्पादनात काहीशी तुट येण्याची शक्यता असल्यामुळे हे निर्बंध घालण्यात आले आहेत. पण, हे निर्बंध तात्पुरते आहेत. लवकरच निर्बंधांमधून दिलासा देण्यात येईल, असे स्पष्ट संकेत नितीन गडकरी यांनी दिले. त्यात व्हीएसआय आणि शरद पवार यांचे मोठे योगदान आहे. नागपूरनजीक बुटीबोरी येथे व्हीएसआयने संशोधन केंद्र स्थापन केल्यामुळे आता विदर्भात उसाचे क्षेत्र वाढून साखर उद्योगाच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण होईल आहे.

## मोशीतील अतिउच्चदाब वीज उपकेंद्राच्या

# जागेचा प्रश्न सुटणार!

### आ. महेश लांडगे यांची बैठक : तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील प्रस्तावित सफारी पार्क मोशी किंवा परिसरातील उपलब्ध शासकीय १५ एकर जागा महावितरण अतिउच्चदाब उपकेंद्राकरिता मिळणेबाबत तात्काळ प्रस्ताव सादर करावा, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी राजेश देशमुख यांनी दिले आहेत.**



भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा प्रशासनाशी संबंधित विविध प्रलंबित विकासकामांबाबत पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी राजेश देशमुख आणि संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. आमदार महेश लांडगे म्हणाले की, भोसरी, आकुर्डी औद्योगिक परिसर तसेच मोशी, चिखली, डुडूळगाव व सभोवतालचा परिसर वेगाने विकसित होत आहे. त्याच प्रमाणात वीज ग्राहकांची संख्या वाढली असून, मागणीही मोठ्या प्रमणात वाढली आहे. याच भागात ईडब्ल्यएस गृहप्रकल्पांची कामेही प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे भविष्यात उपलब्ध यंत्रणेद्वारे वीज पुरवठा करणे जिकीरीचे होणार असून, अतिभारीत होवून वीज पुरवठ्याची गंभीर समस्या निर्माण होणार आहे. तसेच वीज पुरवठा खंडीत होण्याच्या तक्रारी वाढणार आहेत. परिणामी, भविष्यातील वीज मागणीच्या अनुशंगाने वीज पुरवठ्याबाबत पायाभूत सुविधा सक्षम करणे अत्यावश्यक आहे. या भागातील वीज मागणी पूर्ण करण्यासाठी मोशी येथे अतिउच्चदाब वीज उपकेंद्र उभारणे प्रस्तावित आहे.

तसेच, २०१४ पासून भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांच्या विकासाला चालना देण्यात आली. २०१७ महापालिकेत सत्ता मिळाल्यानंतर निर्माण केलेल्या पायाभूत सोयी-सुविधांमुळे 'चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित झाला आहे. पीएमआरडीए आणि महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून पायाभूत प्रकल्प मार्गी लागले आहेत. खेड ते नाशिक फाटा एलिबेटेड हायवे याच भागातून जाणार आहे. त्यामुळे नागरिकरण आणि औद्योगिकरण मोठ्याप्रमाणात वाढणार आहे. त्यासाठी सफारी पार्क मोशी किंवा सभोवतालच्या परिसरातील उपलब्ध १५ जागा महावितरण अतिउच्चदाब उपकेंद्र उभारणीकरीता मिळावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी जिल्हाधिकारी प्रशासनाकडे केली. त्याला जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत.

> भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवडमधील वीज पुरवठा करणारी पायाभूत यंत्रणा सुमारे ३० ते ३५ वर्षांपूर्वीची आहे. वाढती लोकसंख्या आणि वीजेची मागणी याचा विचार करता समाविष्ट गावांमध्ये तर वीज वितरण व्यवस्थेवर मोठा ताण आहे. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. विधानसभा सभागृहामध्ये लक्षवेधीद्वारे राज्य सरकारचे लक्ष वेधले. त्यामुळे भोसरी महावितरण विभागाचे विभाजन आणि मनुष्यबळ उपलब्धता याबाबत सकारात्मक निर्णय झाला. त्यानंतर आता निधी उपलब्ध करुन संबंधित प्रस्तावित प्रकल्प मार्गी लावण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे. जागेचा प्रश्न निकाली निघाल्यास मोशीतील अतिउच्चदाब वीज उपकेंद्र उभारण्याच्या कामाला गती मिळणार आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# समाज परिवर्तनामध्ये वारकरी सांप्रदायाचे योगदान!

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी : आळंदी येथे 'ज्ञानभूमी' प्रकल्पाचे भूमिपूजन

। पिंपरी । प्रतिनिधी । महाईन्यूज

**मूल्याधिष्ठित आध्यात्मिक व धार्मिक जे संस्कार आपलं व्यक्तित्व जीवन बद्दलवणारे आहेत.ते आपल्या सामाजिक,एकंदरीत सामाजिक क्षेत्राला संस्कारित आहेत.आणि संस्कार आपल्या सगळ्यांवर निर्माण करण्याचे काम संतांनी केलेले आहे.वारकरी संप्रदायात जीवन समर्पित करणारे या संप्रदयात अनेक व्यक्तित्व आहेत.सामाजिक परिवर्तनामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे, असे मत केंद्रीय वाहतूक व महामार्ग विकास मंत्री नितीन गडकरी यांनी मांडले.**



आळंदी येथे ज्ञानभूमी या वारकरी केंद्रित बहुउद्देशीय प्रकल्पाचा भूमिपूजनाचा सोहळा नितीन गडकरी यांच्या हस्ते शांतिब्रम्ह हभप मारोती महाराज कु-हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी आमदार महेश लांडगे, आमदार दिलीप मोहिते-पाटील, विश्वस्त मंडळ योगेश देसाई, राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ, भावार्थ देखणे, विकास ढगे पाटील, लक्ष्मीकांत देशमुख, देवस्थान व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, वारकरी संप्रदायातील मान्यवर व आळंदीकर ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी नितीन गडकरी म्हणाले, या प्रकल्पाचे नाव ज्ञानभूमी आहे. ज्ञानाला इंग्लिश मध्ये पॅरलेल् शब्द आहे नॉलेज आणि ज्ञान जे आहे ते ज्ञानेश्वर महाराजांनी आम्हा सगळ्यांना ज्ञानेश्वरीच्या रूपाने दिले आहे. ज्ञानेश्वर महाराज यांनी केलेलं पसायदान त्याच्यातला प्रत्येक शब्द आणि त्याचा अर्थ हा प्रत्येक जण आपल्या जीवनात आचरण करत असतो. महाराष्ट्र संताची भूमी आहे.

#### आळंदीच्या विकासाचा मास्टर प्लॅन करावा...

» नितीन गडकरी म्हणाले की, जगामध्ये जे लोक अनेक देशात गेले असतील, त्यांना एक गोष्ट वैश्यम वाटते . आपण कुठल्याही धर्माच्या स्थानी जा तिथे शुद्धता, स्वच्छता, चांगले रोड, उत्तम धर्मशाळा सर्व प्रकारच्या सुविधा होतात. परंतु, आपले जे मंदिर आहेत, आपली (ALANDI) तीर्थक्षेत्र स्थान आहेत, जेव्हढी चांगली असायला पाहिजे, तेव्हढी अजून पर्यंत आपण करू शकलो नाहीत. पंढरपूर ते देहू, आळंदी पालखी मार्गावर वृक्ष कसे लागतील याबाबत संबंधित इंजिनिअरना सूचना केल्या आहेत. यावेळी त्यांनी सांगितले. तसेच ते म्हणाले ज्ञानेश्वरी व पसायदानामध्ये खूप मोठं ज्ञान आहे. शेगाव देवस्थान, शिर्डी देवस्थान, तिरुपती देवस्थान चांगल झाले आहे. आता आपण या (आळंदी) देवळाच्या आजूबाजूला चांगला मास्टर प्लॅन करून शंभर वर्षाचा शंभर वर्षाच्या पलीकडचा विचार करून सर्व देवस्थानचा विचार केला पाहिजे.

# व्यापारतूट रोखण्यास इच्छाशक्तीचे इंधन




**सध्या देशाची वाढणारी व्यापारतूट भविष्यातील संकटांची पूर्वकल्पना देत आहे. व्यापारतुटीमुळे अनेक अनर्थ ओढवतात. त्यामुळे वेळीच सावध होऊन धोरणात्मक पावले उचलली पाहिजेत. निर्यातवाढीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्यासाठी व्यापक उपाययोजनांची गरज आहे.**

भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील घोडदौड सध्या जोरात चालू आहे, भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर सातत्याने परदेश दौरे करून आंतरराष्ट्रीय संबंध वाढण्यावर, ते अधिक बळकट करण्यावर भर देत आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी म्यानमार आणि नेपाळचा दौरा केला. नेपाळमध्ये तर त्यांनी भारतीय अनुदानावर तेथील ऊर्जानिर्मितीच्या प्रकल्पाला मोठे सहाय्यसुद्धा जाहीर केले; तर दुसरीकडे भारताचे वाणिज्य मंत्री पीयुष गोयल वेगवेगळ्या देशांशी व्यापार करार करण्यासाठी शिकस्त करत आहेत. नुकतेच भारत-ऑस्ट्रेलिया व्यापार करार स्वीकारल्याच्या घटनेला एक वर्ष पूर्ण झाले. काही दिवसांपूर्वीच भारताचे इतर देशांबद्दलच्या व्यापार तुटीचा अहवाल एका वृत्तवाहिनीने जाहीर केला. त्या अहवालानुसार दहा प्रमुख देशांपैकी नऊ देशांबरोबर भारताची व्यापार तूट मोठी असल्याचे निदर्शनास आले आहे. व्यापार तूट म्हणजे, भारतात येणाऱ्या आयात वस्तू आणि त्याची किंमत ही भारतातून निर्यात



होणाऱ्या वस्तूंच्या किमतीपेक्षा अधिक असणे असा आहे. थोडक्यात आयात अधिक आणि निर्यात कमी अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होते तेव्हा व्यापारतूट निर्माण झाली असे म्हटले जाते. सध्या भारताची व्यापार तूट फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे, असे हा अहवाल सांगतो. केवळ अमेरिकेबरोबरच भारताची व्यापार तूट नसल्याचे सदर अहवालात म्हटले आहे. व्यापार तुटीबाबत सोप्या भाषेत बोलायचे झाल्यास जेव्हा एखादा देश निर्यातीपेक्षा जास्त वस्तू आणि सेवा आयात करतो, तेव्हा व्यापारतूट निर्माण होते. दुसऱ्या शब्दांत, हे त्या रकमेचे प्रतिनिधित्व करते ज्याद्वारे देशाच्या आयातीचे मूल्य एका विशिष्ट कालावधीत, विशेषतः एका वर्षात त्याच्या निर्यातीच्या मूल्यापेक्षा जास्त असते. यामुळे अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते की, एखादा देश त्याच्या निर्यातीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा परदेशी वस्तू आणि सेवांवर जास्त खर्च करत आहे, ज्याचे विविध आर्थिक परिणाम होऊ शकतात. खासकरून व्यापारतूट देशाच्या अर्थव्यवस्थेवर अनेक प्रकारे परिणाम करू शकते. त्यामध्ये चलन घसरण ही प्रामुख्याने घडणारी घटना होय. सततच्या व्यापार तुटींमुळे देशाच्या चलनाच्या मूल्यावर घसरणीचा दबाव येऊ शकतो. याचे कारण आयातीसाठी परदेशी चलनांची मागणी वाढलेली असते. त्यामुळे मागणी-पुरवठा धोरणानुसार चलन पुरवठा कमी पडल्याने त्याच्या मूल्यावर परिणाम होतो आणि परिणामतः देशाच्या गंगाजळीवर परिणाम होतो. व्यापारतूट याचा दुसरा महत्त्वाचा परिणाम नोकरी आणि उद्योगांवर होतो. सततच्या व्यापार तुटीमुळे मुख्यतः स्वस्त आयातीमुळे वाढलेल्या स्पर्धेला तोंड देणाऱ्या क्षेत्रांमध्ये नोकऱ्या गमावल्या जाऊ शकतात. जसे की आपण आयात केलेल्या एका वहीची किंमत दहा रुपये असेल आणि आपल्याकडील वहीची किंमत बारा रुपये असेल तर स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्या वही उत्पादकाला किंमत कमी करावी लागेल. त्यासाठी त्याला खर्चासह कामगारकपातही करावी लागेल. परिणामतः बेरोजगारीसारख्या समस्या देशपातळीवर निर्माण होऊ शकतात. आहे. त्याचबरोबर त्याचा देशांतर्गत उत्पादन क्षेत्रासारख्या उद्योगांवर परिणाम होऊ शकतो. व्यापारतूट एखाद्या देशाला तिसऱ्या परिणामाकडे घेऊन जाऊ शकते. ते म्हणजे कर्ज घेणे. व्यापारतूट भरून काढण्यासाठी एखाद्या देशाला परदेशी संस्थांकडून कर्ज घ्यावे लागू शकते, जसे की जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ). पण त्या उपायामुळे देशाचे परकी कर्ज वाढते आणि परिणामतः देशाची आर्थिक स्थिती विशेष करून आंतरराष्ट्रीय स्तरावर कमकुवत होते.व्यापार तुटीचा अप्रत्यक्ष संदर्भ देशाच्या स्पर्धात्मकतेवर जोडला जातो. असे मानले जाते की, देशांतर्गत उद्योग जागतिक स्तरावर स्पर्धात्मक नाहीत. म्हणजे भारतीय उत्पादने जगाच्या मागणीनुसार पुरवठा करण्याच्या गुणवत्तेची नसल्याने सदर उत्पादनांचा विचार केला जात नाही किंवा तत्सम आंतरराष्ट्रीय उत्पादनाच्या स्पर्धेमध्ये भारतीय उत्पादकांची पीछेहाट होते. यात विशेष करून किंमत आणि गुणवत्ता या घटकांचा विचार केला जातो.

## संपादकीय »

# निकाल लागला

***सर्वोच्च न्यायालयाने विधिमंडळात पक्षनेता नेमण्याचा अधिकार पक्षाचाच आणि पक्षाची विधिमंडळ शाखा पक्ष यंत्रणेशिवाय असू शकत नाही, हे स्पष्ट केले होते.***

सभापती, राज्यपाल, राष्ट्रपती पदांवरील व्यक्ती अ-राजकीय असतात, निवडणूक आयोग तटस्थ असतो वगैरे तत्त्वज्ञान हे शालेय पाठ्यपुस्तकांच्या पहिल्या पानावरील प्रतिज्ञेइतकेच सत्य असते हे भान समस्त भारतवर्षास येऊन बराच काळ लोटला. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष रा. रा. राहुल नार्वेकर यांनी शिवसेना फुटीसंदर्भात दिलेल्या निर्णयाने कोणालाही धक्का बसणे संभवत नाही. हा, असाच आणि इतकाच निर्णय याप्रकरणी अपेक्षित होता आणि तो तसाच आणि तितकाच आला, यात आश्चर्य अजिबात नाही. प्रचलित राजकारणाकडे डोळे उघडे ठेवून आणि डोके कोणा चरणी न ठेवता जे कोणी पाहात असतील त्या सर्वांस या निर्णयामागील अपरिहार्यता लक्षात येईल. त्यासाठी सभाध्यक्ष नार्वेकर यांचा शिवसेना ते भाजप व्हाया राष्ट्रवादी काँग्रेस हा प्रवास आठवण्याची मुळीच गरज नाही.

**वैधानिक प्रकाशन २०२२-२३ मधील ‘बँकिंगचा कल आणि प्रगती’ यावरील अहवाल जारी केला. हा अहवाल बँकिंग क्षेत्राची कामगिरी सादर करतो. त्या निमित्ताने रिझर्व्ह बँकेविषयी दिलेली ठळक निरीक्षणे आणि बँकिंग क्षेत्रासाठी सुचवलेल्या उपाययोजना याचा आढावा.**

# कात टाकणारे बँकिंग क्षेत्र

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया १९५६पासून ‘बँकिंगचा कल आणि प्रगती अहवाल’ प्रत्येक वर्षी प्रसिद्ध करीत असते. ‘रिपोर्ट ऑन ट्रेंड्स अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया’ या अहवालात बँक आणि बँकेतर वित्तीय संस्था यांच्या कार्याचा आणि प्रगतीचा गेल्या आर्थिक वर्षाचा आढावा बँकेने घेतला आहे. बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राने लवचिकता, नवकल्पना आणि डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती केलेली दिसून येते. कोविड काळातील परिणामाच्या चढ-उतारांमधून मार्गक्रमण करताना २०२३ हे वर्ष भारतासाठी अधिक मजबूत आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगती करण्यात महत्त्वपूर्ण ठरले आहे. धोरणात्मक सुधारणांपासून ते डिजिटल व्यवहारांमध्ये नवीन टप्पे गाठण्यापर्यंत बँकिंग क्षेत्राने वाढीला चालना देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कोविडनंतर बँकांनी आणि बिगरबँकिंग वित्तीय संस्थांनी पुन्हा एकदा उभारी घेतली आहे.



पतनिर्मिती, पतपुरवठा आणि निधी उभारण्यात देशाच्या विकासात बँका महत्त्वाची भूमिका बजावत असतात. जागतिकीकरणानंतर बँकांबरोबर वित्तीयसंस्था यांनीही पतपुरवठानिर्मिती आणि निधी उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यामुळेच वित्तीय संस्था, सहकारी बँका, व्यावसायिक बँका, व्यापारी बँका यांच्या प्रगतीचा अहवाल ‘आरबीआय’ने बँकेच्या प्रगती अहवालाबरोबर मांडला आहे. भांडवली साठ्यात वाढ: २०२२-२३ मध्ये शेड्युल्ड कमर्शियल बँकांच्या एकत्रित ताळेबंदात १२.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. बँकांचा क्षेत्रीय पतपुरवठा हा मोठ्या प्रमाणात सेवा क्षेत्राला होत असून बँकेच्या नफ्याचे प्रमाण वाढत आहे. बँकेकडे असणाऱ्या ठेवींचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत असून शेड्युल्ड कमर्शियल बँकांचे भांडवल ते जोखीमभारित मालमत्तेचे प्रमाण सप्टेंबर २०२३ च्या अखेरीस १६.८ टक्के होते. याचा अर्थ वित्तीय जोखीमेचा सामना करण्यासाठी बँकांकडे पुरेसा भांडवलसाठा आहे. अनुत्पादक मालमतेच्या प्रमाणात घसरण: बँकेकडे असणाऱ्या अनुत्पादक मालमत्तांचा प्रश्न गंभीर आहे.मागील दोन वर्षांपासून स्थितीत सुधारणा दिसते. रिझर्व्ह बँकेने अनुत्पादक मालमत्तांचे प्रमाण कमी करण्यासाठी काही पावले उचललेली दिसून येतात. त्याचा परिणाम म्हणूनच भारतीय बँकिंग क्षेत्र हळूहळू याच्या विळख्यातून मुक्त होताना दिसून येत आहे. अनुत्पादक मालमतेचे प्रमाण कमी होणे म्हणजेच बँकेकडे भांडवलसाठ्यात वाढ होणे आणि बँकेची नफाक्षमता वाढणे होय. जोखीम कमी करणे: बिगरबँकिंग वित्तीय संस्था मुख्य प्रवाहातील बँकांवर अनेक गोष्टींसाठी अवलंबून असतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गोगावलेंचा व्हीप आम्हाला लागू नाही

## आता आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार अनिल परब

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निकालानंतर भरत गोगावलेंच व्हीप हा अधिकृत असून तोच लागू होणार असल्याचं मान्य केलं. यावर अनिल परब (ANIL PARAB) यांनी माझा कट्ट्यावर (MAJHA KATTA) म्हटलं की, आम्हाला भरत गोगावले यांचा व्हीप लागू होणार नाही आणि आम्ही तो मान्यही करणार नाही. आम्हाला निवडणूक आयोगाने मान्यता दिलीये, सर्वोच्च न्यायालयाने आम्हाला अपात्र केलेलं नाही.**




10 व्या सूचीनुसार फूट ही ग्राह्य धरली जाणार नाही. त्यासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाऊन आम्हाला विचारायचं आहे, की सुप्रीम कोर्ट म्हणतंय की फूट पडू शकत नाही, निवडणूक आयोग म्हणत फूट पडली हे मान्य. ज्यावेळी त्यांनी बंड केलं तेव्हाच त्यांना सांगितलं की तुम्हाला अभय दिलंय. जर आमचा व्हीप मान्य नाही तर आम्हाला पात्र का केलंत, असा सवाल देखील अनिल परब यांनी उपस्थित केलाय. जसे ते कायदेशीर सल्ला घेतात तसाच आम्हीही तो सल्ला घेतो. ज्यावेळी दोन निकालांमध्ये तफावत दिसते, त्यावेळी प्रश्न निर्माण होतो की नक्की कोण मोठं. जर सर्वोच्च न्यायालयाने शिंदेंना मान्यता दिली, तर आम्ही नवीन पक्ष रजिस्टर करु. गोगावले यांचा व्हीप आम्हाला लागू होणार नाही. हा जो काही निकाल होता, तो स्क्रिप्टेड होता. जर एका कलामाखाली पात्र करता येतं, तर अपात्र कसं करता येत नाही. त्यांनी फक्त व्हीपबाबत भाष्य केलं. त्यामुळे आता आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचं अनिल परब यांनी म्हटलं. आमची मशाल आता सगळीकडे धगधगतेय, त्याचाच त्यांना त्रास होतोय. त्यामुळे या मशालीची ताकद त्यांना लवकरच कळेल. यातल्या कित्येक लोकांनी बाळासाहेबांना पाहिलं नाही, ते म्हणतात आम्ही बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन जातोय. जर या लोकांना काही अडचण होती, तर मविआचं सरकार स्थापन करतानाच त्यांनी सांगायला हवं होतं की, आम्हाला मंत्रीपद नको, आम्ही मंत्रिमंडळात येणार नाही. आम्ही पण यातून गेलो होतो, काय दवाब टाकला जातो हे आम्हालाही माहित आहे, असं म्हणत अनिल परब यांनी शिंदे गटावर हल्लाबोल केला. शिवसेना आणि ठाकरे कधीही वेगळे होऊ शकत नाही. शिवसनेचे सगळे चांगले वाईट दिवस आम्ही बघितले आहोत. त्यामुळे आज जर हे आम्हाला सांगत असतील की बाळासाहेबांचे विचार घेऊन पुढे चाललोय. त्यांना जर काही अडचण होती, तर तेव्हाच राजीनामा द्यायला हवा होता. आम्ही सैनिक आहोत, पक्षाच्या प्रमुखांनी जो निर्णय घेतला, तो आम्ही मान्य करतो, त्यावर आम्ही प्रश्न विचारत नाही, असं अनिल परब यांनी म्हटलं. भाजपने आम्हाला दिलेला शब्द पाळला नाही. भाजपने ते करायला हवं होतं. त्यावेळेला तुम्ही सगळी पदं उपभोगलीत. जेव्हा त्यांना ईडीची भीती दाखवली गेली, तेव्हा ते सगळे बाहेर गेले. आतापर्यंत पक्षावर दावा कधी कोणा केला नव्हता, जे आता झालंय. राष्ट्रवादी शरद पवारांची नाही, असं महाराष्ट्र का मान्य करेलं. इथे बाळासाहेब नाहीत म्हणून हा प्रश्न उपस्थित झाला, तिथे तर शरद पवार आहेत, तरीही हा प्रश्न निर्माण होतो. त्यांचा आरोप होता, अजित पवार असं करतात, तसं करतात. आज अजित पवारांच्याच हाताखाली काम करतायत. शेवटी प्रत्येकजण सत्तेच्या छत्रीखाली गेलाय. ज्यांच्या हातात छत्री आहे, ते फक्त मज्जा बघतंय. त्यामुळे सध्या भाजप फूट पाडून सगळी मज्जा बघतोय, अशी टीका अनिल परब यांनी भाजपवर केली. उद्धव ठाकरे हे भावनिक आहेत, त्यांना राजकीय खेळी इतक्या काही जमत नाहीत. त्यांनी भावनेपोटी हा राजीनामा दिला.

### आयोग म्हणत फूट पडली हे मान्य

माझ्यावरचा माझ्या लोकांचा विश्वास नव्हता असं त्यांना वाटलं. मला सत्तेचा मोह नाही, हे पटवून देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला. त्यामुळे सध्या उद्धव ठाकरेंच्या काय चुका आहेत, हे दाखवण्याचा प्रयत्न केला जातोय. उद्धव ठाकरेंनी जो राजीमाना दिला तो भावनिक राजीनामा होता, असं अनिल परब यांनी म्हटलं. 10 व्या सूचीनुसार फूट ही ग्राह्य धरली जाणार नाही. त्यासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाऊन आम्हाला विचारायचं आहे, की सुप्रीम कोर्ट म्हणतंय की फूट पडू शकत नाही, निवडणूक आयोग म्हणत फूट पडली हे मान्य. ज्यावेळी त्यांनी बंड केलं तेव्हाच त्यांना सांगितलं की तुम्हाला अभय दिलंय. जर आमचा व्हीप मान्य नाही तर आम्हाला पात्र का केलंत, असा सवाल देखील अनिल परब यांनी उपस्थित केलाय. जसे ते कायदेशीर सल्ला घेतात तसाच आम्हीही तो सल्ला घेतो. ज्यावेळी दोन निकालांमध्ये तफावत दिसते, त्यावेळी प्रश्न निर्माण होतो की नक्की कोण मोठं. जर सर्वोच्च न्यायालयाने शिंदेंना मान्यता दिली, तर आम्ही नवीन पक्ष रजिस्टर करु. गोगावले यांचा व्हीप आम्हाला लागू होणार नाही. हा जो काही निकाल होता, तो स्क्रिप्टेड होता. जर एका कलामाखाली पात्र करता येतं, तर अपात्र कसं करता येत नाही.

# अहंकारी लोकांचा अहंकार संपणार : मुख्यमंत्री

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला विरोधकांवर हल्लाबोल

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) राज्यासाठी वेळ देत असतात. पंतप्रधान मोदींना (PM MODI) एवढं प्रेम देशात मिळते तेवढं प्रेम देशात कुणालाच मिळत नसेल. विरोधकांना हे खटकत त्यांच्या पोटात दुखते. आता अहंकारी लोकांचा अहंकार संपणार असल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. 'अबकी बार 400 पार' या घोषणेची आमचीही जबाबदारी असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे उद्‌घाटन आणि भूमीपूजन करण्यात आले. त्यावेळी नवी मुंबई विमानतळ मैदानात आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान मोदींवर स्तुतीसुमनं उधळताना विरोधकांवर हल्लाबोल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, 50 वर्षात जे झालं नाही ते मोदींनी करून दाखवलं. आमच्या भारताच्या अर्थ व्यवस्थेला मोदींनी मजबूत केले. करोडो राम भक्तांचे जे स्वप्न होते राम मंदिर झालं पाहिजे ते आज पंतप्रधान मोदींनी पूर्ण केले. आज बाळासाहेब ठाकरे असते



तर त्यांनी मोदींचे मनमोकळेपणा अभिनंदन केले असते असे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. आज 22 किलोमीटरचा समुद्री पूल सुरू झाला आणि त्याचा शुभारंभ मोदींनी केला आहे. तरी देखील अधिकाऱ्यांनी काम पूर्ण केले. अटल सेतू प्रकल्प गेमचेंजर आहे. अत्याधुनिक यंत्रणा वापरून हा प्रकल्प आपण पूर्ण केला आहे. मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण याचा शुभारंभ होणार आहे. लेक लाडकी लखपती याचा आपण शुभारंभ आपण करत आहोत असेही त्यांनी म्हटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे उद्‌घाटन आणि भूमीपूजन करण्यात आले. त्यावेळी नवी मुंबई विमानतळ मैदानात आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान मोदींवर स्तुतीसुमनं उधळताना विरोधकांवर हल्लाबोल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, 50 वर्षात जे झालं नाही ते मोदींनी करून दाखवलं.

### 22 किलोमीटरचा पूल सुरु झाला

आमच्या भारताच्या अर्थ व्यवस्थेला मोदींनी मजबूत केले.करोडो राम भक्तांचे जे स्वप्न होते राम मंदिर झालं पाहिजे ते आज पंतप्रधान मोदींनी पूर्ण केले. आज बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी मोदींचे मनमोकळेपणा अभिनंदन केले असते असे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. आज 22 किलोमीटरचा समुद्री पूल सुरू झाला आणि त्याचा शुभारंभ मोदींनी केला आहे. तरी देखील अधिकाऱ्यांनी काम पूर्ण केले. अटल सेतू प्रकल्प गेमचेंजर आहे. अत्याधुनिक यंत्रणा वापरून हा प्रकल्प आपण पूर्ण केला आहे.

# आज होणार इंडिया आघाडीची बैठक!

## नितीशकुमारांची समन्वयक आणि खरगेंची अध्यक्ष म्हणून वर्णी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीची शनिवार 13 जानेवारी रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार आहे. सकाळी 11.30 वाजता या बैठकीचं आयोजन करण्यात आसून ही बैठक ऑनलाईन पद्धतीने पार पडेल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बिहारचे मुख्यमंत्री आणि जेडीयू अध्यक्ष नितीश कुमार (NITISH KUMAR) यांची समन्वयक म्हणून नियुक्ती केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे काँग्रेसचे प्रमुख मल्लिकार्जुन खरगे यांना इंडिया आघाडीचे अध्यक्ष बनवले जाऊ शकते.**




इंडिया आघाडीमध्ये समाविष्ट असेलेले बहुतेक पक्ष हे नितीश कुमार यांना समन्वयक बनविण्यावर सहमत आहेत. परंतु पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेस (टीएमसी) च्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी याबाबत अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. दरम्यान उद्या होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीत शरद पवार, उद्धव ठाकरे, राहुल गांधी, ममता बॅनर्जी, एम.के स्टॅलिन उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आलीये. आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान शनिवारी होणारी इंडिया आघाडीची ही बैठक जागावाटपाच्या निर्णयांसंदर्भात महत्त्वाची असल्याचं म्हटलं जात आहे. कारण लोकसभेच्या निवडणुका अवघ्या काही महिन्यांवर आल्या आहेत, त्यातच इंडिया आघाडीला जागावाटपाबाबत ठोस भूमिका घ्यायची आहे. आतापर्यंत उद्धव ठाकरे, शरद पवार, अरविंद केजरीवाल, RJD आणि समाजवादी पक्ष यांच्यासोबत जागावाटपाबाबत बैठका घेतल्या आहेत. मात्र, अद्यापही तृणमूल काँग्रेससोबत कोणतीही चर्चा झालेली नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 11 जानेवारी रोजी टीएमसीने काँग्रेसला लोकसभेच्या 42 जागांपैकी 2 जागांची ऑफर दिली आहे. तृणमूल काँग्रेसची ऑफर नाकारताना काँग्रेसने सांगितले की, ती फारच लहान जागा असल्याने ते यासाठी तयार नाहीत. तृणमूल बंगालमध्ये काँग्रेसला 3 जागा देण्यास तयार आहे, परंतु त्यासाठी आम्हाला आसाममध्ये दोन आणि मेघालयमध्ये एक जागा द्यावी लागेल, अशी ऑफर काँग्रेसला देण्यात आलीये. इंडिया आघाडीच्या आतापर्यंत चार बैठका पार पडल्या आहेत. यातील पहिली बैठक 23 जून रोजी पाटणा, बिहार येथे झाली. दुसरी बैठक 17 आणि 18 जुलै रोजी बेंगळुरू येथे झाली. तिसरी बैठक 31 आणि 1 सप्टेंबर रोजी मुंबईत झाली. याशिवाय चौथी बैठक डिसेंबरमध्ये दिल्लीत झाली. विरोधी आघाडी भारताच्या चौथ्या बैठकीत पंतप्रधानांचा चेहरा, जागावाटप आणि संयुक्त रॅलीसह अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. काँग्रेस, टीएमसी, जेडीयू, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह अनेक पक्ष यामध्ये सहभागी आहेत.इंडिया आघाडीमध्ये समाविष्ट असेलेले बहुतेक पक्ष हे नितीश कुमार यांना समन्वयक बनविण्यावर सहमत आहेत. परंतु पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेस (टीएमसी) च्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी याबाबत अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. दरम्यान उद्या होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीत शरद पवार, उद्धव ठाकरे, राहुल गांधी, ममता बॅनर्जी, एम.के स्टॅलिन उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आलीये. आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान शनिवारी होणारी इंडिया आघाडीची ही बैठक जागावाटपाच्या निर्णयांसंदर्भात महत्त्वाची असल्याचं म्हटलं जात आहे. कारण लोकसभेच्या निवडणुका अवघ्या काही महिन्यांवर आल्या आहेत.

### तृणमूल काँग्रेसला 3 जागा

» आतापर्यंत उद्धव ठाकरे, शरद पवार, अरविंद केजरीवाल, RJD आणि समाजवादी पक्ष यांच्यासोबत जागावाटपाबाबत बैठका घेतल्या आहेत. मात्र, अद्यापही तृणमूल काँग्रेससोबत कोणतीही चर्चा झालेली नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 11 जानेवारी रोजी टीएमसीने काँग्रेसला लोकसभेच्या 42 जागांपैकी 2 जागांची ऑफर दिली आहे. तृणमूल काँग्रेसची ऑफर नाकारताना काँग्रेसने सांगितले की, ती फारच लहान जागा असल्याने ते यासाठी तयार नाहीत. तृणमूल बंगालमध्ये काँग्रेसला 3 जागा देण्यास तयार आहे, परंतु त्यासाठी आम्हाला आसाममध्ये दोन आणि मेघालयमध्ये एक जागा द्यावी लागेल, अशी ऑफर काँग्रेसला देण्यात आलीये.

---

# डिसेंबरमध्ये महागाईचा दर वाढला!

## औद्योगिक उत्पादनातील वाढही झाली कमी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**डिसेंबर (DECEMBER) महिन्याची किरकोळ महागाई दराची आकडेवारी समोर आली आहे. गेल्या महिन्यात किरकोळ महागाई (RETAIL INFLATION) दर 5.69 टक्के होता. नोव्हेंबर महिन्याच्या तुलनेत महागाई दर वाढला आहे. अशातच औद्योगिक उत्पादनातील वाढ देखील कमी झाली आहे. नोव्हेंबर महिन्यात किरकोळ महागाई दर हा 5.55 टक्के होता. नोव्हेंबर महिन्यात औद्योगिक उत्पादनाची वाढ 2.4 टक्के होती. ऑक्टोबर महिन्यात ती 11.7 टक्के होती.**



डिसेंबर महिन्यात किरकोळ महागाई दर 5.69 टक्के होता, जो नोव्हेंबर महिन्यात 5.55 टक्के होता. अन्नधान्य महागाई दर 9.53 टक्के होता जो नोव्हेंबरमध्ये 8.70 टक्के होता. ग्रामीण भागातील महागाई 5.93 टक्के होती जी नोव्हेंबरमध्ये 5.85 टक्के होती. शहरी महागाई 5.46 टक्के होती, जी नोव्हेंबरमध्ये 5.26 टक्के होती. कोर महागाई दर 3.9 टक्के होता जो नोव्हेंबरमध्ये 4.1 टक्के होता. ऑक्टोबर ते डिसेंबरमधील तिमाहीबद्दल बोलायचे तर, सरासरी महागाई दर 5.37 टक्के होता. डिसेंबर महिन्यात डाळींच्या महागाईत वाढ झाली असून ती 20.73 टक्के झाली आहे. जी नोव्हेंबर महिन्यात 20.23 टक्के होती. भाज्यांच्या महागाई दरात मोठी वाढ झाली असून, गेल्या महिन्यात 17.70 टक्के होती ती 27.64 टक्के झाली आहे. धान्य आणि संबंधित उत्पादनांच्या महागाई दरात किंचित घट झाली आहे. ती 9.93 टक्के राहिला आहे जो मागील आठवड्यात 10.27 टक्के होता. मसाल्यांच्या महागाईचा दर 19.69 टक्के आहे जो मागील महिन्यात 21.55 टक्के होता. फळांचा महागाई दर 11.14 टक्के आहे जो मागील महिन्यात 10.95 टक्के होता. किरकोळ महागाई सरकार आणि आरबीआयची चिंता वाढवणार आहे. विशेषत: भाजीपाला आणि डाळींची भाववाढ थांबण्याची चिन्हे दिसत नसून, त्याचा परिणाम किरकोळ महागाई दरावर दिसून येत आहे. RBI फेब्रुवारी महिन्यात आर्थिक धोरण जाहीर करेल. अशा स्थितीत किरकोळ महागाई वाढल्यानंतर स्वस्त कर्जाच्या आशा पल्लवित होताना दिसत आहेत. गोल्डमन सॅक्सने आपल्या एका नोटमध्ये म्हटले आहे की, आरबीआय या वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपासून व्याजदरात कपात करण्यास सुरुवात करण्याची शक्यता आहे.

---

# रेल्वे तिकिटावर 55 टक्क्यांची सूट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

तुम्ही भारतीय रेल्वेने प्रवास केल्यास, तुम्हाला प्रत्येक प्रवासात भाड्यात 55 टक्के सूट मिळते. त्यामुळेच रेल्वेने प्रवास करणे आजही सर्वात स्वस्त वाहतुकीच्या पर्यायांपैकी एक आहे. पण तुम्हाला माहिती आहे का? की तुम्हाला एवढी मोठी सूट कशी मिळते? आम्ही तुम्हाला सांगतो, त्याआधी तुम्हाला हे कळले पाहिजे की ही 55 टक्क्यांची सूट नेमकी आली कुठून? भारतीय रेल्वेने प्रवास करणे अजूनही इतर अनेक वाहतुकीच्या साधनांपेक्षा खूपच स्वस्त आहे. याचे कारण म्हणजे रेल्वे प्रत्येक प्रवाशाला भाड्यात 55 टक्के सवलत देते. आता ज्येष्ठ नागरिकांना कोविड पूर्वीप्रमाणे अतिरिक्त सवलत मिळेल की नाही? याबाबत स्पष्टपणे काहीही सांगता येत नाही. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव 'बुलेट ट्रेन'च्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी अहमदाबादमध्ये आले होते. तेथे, जेव्हा माध्यमांनी त्यांना विचारले की सरकार कोविड -19 पूर्वी ज्येष्ठ नागरिक आणि मीडिया कर्मचाऱ्यांना दिलेली भाडे सवलत पुन्हा सुरू करेल का? भारतीय रेल्वे आधीच प्रत्येक प्रवाशाला भाड्यात 55 सवलत देत असल्याचे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. पीटीआयच्या एका बातमीनुसार, मार्च 2020 मध्ये देशात लॉकडाऊन लागू करण्यात आला होता. त्यानंतर गाड्यांची वाहतूकही पूर्णपणे ठप्प झाली आहे. यापूर्वी, रेल्वे मान्यताप्राप्त पत्रकार आणि ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे भाड्यात 50 टक्के सवलत देत असे.

# बिपाशा बासूने सोशल मीडियावरील मालदीवचे फोटो केले डिलीट


बॉलीवूडचे अनेक कलाकार आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी किंवा इतर खास दिवसासाठी मालदीवला जातात. त्याचप्रमाणे अभिनेत्री बिपाशा बासू देखील ७ जानेवारीला तिचा ४५वा वाढदिवस साजरा करण्यासाठी मालदीवला गेली होती. यावेळी तिच्याबरोबर पती करण सिंह ग्रोव्हर आणि मुलगी देवी देखील होते. या खास क्षणाचे फोटो बिपाशा व करणने सोशल मीडियाद्वारे चाहत्यांबरोबर शेअर केले होते. पण यामुळे दोघं खूप ट्रोल झाले; ज्यानंतर बिपाशा व करणने सोशल मीडियावरील मालदीवचे फोटो डिलीट केले आहेत. पण नेमकं काय घडलं? जाणून घ्या... अभिनेत्री बिपाशा बासू व अभिनेता करण सिंह ग्रोव्हरने तीन दिवसांपूर्वी मालदीवचे फोटो शेअर केले होते. ज्यामध्ये दोघं लाडक्या लेकीबरोबर वेळ घालवताना दिसत होते. पण यावेळी दुसऱ्याबाजूला भारत आणि मालदीवमध्ये राजकीय तणाव निर्माण झाला होता. मालदीवच्या काही मंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर अपमानास्पद टीका केली होती. तसेच काही मंत्र्यांनी भारतीय संस्कृतीला लक्ष्य केलं आणि भारतीयांवर वर्णद्वेषी टीप्पण्या केल्या. त्यामुळे वातावरण तापलं होतं. भारतात बॉयकॉट मालदीव ट्रेंड सुरू होतं. त्यामुळे बिपाशा व करण ट्रोलिंगच्या जाळ्यात अडकले. एका नेटकऱ्याने त्यांच्यावर फोटोवर लिहिल होतं, “मालदीव सरकारने आपला अपमान केला आणि तुम्ही मालदीवमध्ये आहात. तुम्ही तर देशद्रोही आहात.” तसेच दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिल होतं, “सिनेसृष्टी मालदीव बॉयकॉट करत आहे आणि तुम्ही प्रमोशन करत आहात, लाज वाटली पाहिजे.” अशा प्रकारच्या अनेक प्रतिक्रिया बिपाशा-करणच्या फोटो आल्या होत्या. त्यामुळे दोघांनी मालदीवचे फोटो डिलीट करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, बिपाशाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती गेले कित्येक वर्ष अभिनय क्षेत्रापासून दूर आहे. तिचा शेवटचा चित्रपट २०१८साली प्रदर्शित झाला होता. पण तिचा नवरा अजूनही अभिनय क्षेत्रात सक्रिय आहे. हृतिक रोशनच्या ‘फायटर’ चित्रपटात तो पाहायला मिळणार आहे. २५ जानेवारीला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.बॉलीवूडचे अनेक कलाकार आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी किंवा इतर खास दिवसासाठी मालदीवला जातात.

## ते कधीच मुलांचे मित्र झाले नाहीत

करण जोहरच्या ‘कॉफी विथ करण’च्या आठव्या पर्वाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. नुकतीच या कार्यक्रमात बॉलीवूडच्या एव्हरग्रीन अभिनेत्री नीतू कपूर आणि झीनत अमान यांनी हजेरी लावली होती. या भागात नीतू कपूर यांनी वैयक्तिक आयुष्य व पती ऋषी कपूर यांच्याबद्दलचे अनेक किस्से शेअर करत काही आठवणी सांगितल्या. ऋषी कपूर शेवटच्या दिवसांमध्ये ल्युकेमिया या आजारावर उपचार घेत होते. या दिग्गज अभिनेत्यावर न्यूयॉर्कमध्ये उपचार सुरू होते. याविषयी सांगताना नीतू कपूर म्हणाल्या, “आयुष्यातील दु:खद घटना मी फारशा आठवत नाही. पण, आम्ही दोघांनी एकत्र न्यूयॉर्कमध्ये जो वेळ घालवला ते सगळे क्षण आजही मला आठवतात. त्या दिवसांत आम्ही दोघं एकत्र होतो ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. सुरुवातीच्या काळात मी जेव्हा यश चोप्रांबरोबर शूटिंग करायचे तेव्हा रात्री उशिरा पार्ट्या व्हायच्या. मी तेव्हा कोणत्याही पार्टीला जायचे नाही. कारण, ते (ऋषी कपूर) मला नेहमी सांगायचे घरी जा...पार्ट्यांमध्ये जाण्यास त्यांनी मनाई केली होती. तेव्हा माझ्या आयुष्यात दोन शिस्तबद्ध माणसं होती एक माझी आणि आणि दुसरे कडक शिस्तीचे माझे बॉयफ्रेंड ऋषी कपूर. यामुळे मी आयुष्यात कधीच

## कंगनाचा बिल्किस बानोवर चित्रपट?

बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार आणि तिच्या कुटुंबाच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा झालेल्या ११ दोषींची शिक्षा माफ करण्याचा निर्णय गुजरात सरकारने दिला होता होता. तो निर्णय सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला. या निकालानंतर कंगना रणौतने एक्सवर पोस्टमध्ये सांगितलं की बिल्किस बानोच्या जीवनावर स्क्रिप्ट तयार असूनही कोणत्याही मोठ्या स्टुडिओ किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मने या प्रोजेक्टला पाठिंबा देण्यास रस दाखवला नाही. कंगना रणौत सध्या सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे आणि चाहत्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना दिसत आहे. आता एका चाहत्याने विचारलं “प्रिय कंगना, तुम्ही नेहमी महिलांच्या हक्कांबद्दल बोलता. महिला सक्षमीकरणाबाबत तुमची तळमळ पाहून खूप आनंद होतो. मला तुम्हाला विचारायचं आहे की, तुम्ही ‘बिल्किस बानो’वर चित्रपट बनवणार का? फेमिनिझमसाठी नाही तर एक स्त्री म्हणून तिची कथा जगासमोर आणायला आवडेल का? या चित्रपटाद्वारे तुम्ही दाखवू शकता की एका राज्य सरकारने दहशतवादी संघटनेच्या मदतीने एका विशिष्ट समुदायावर कसा अत्याचार केला. राज्य सरकारमुळे एका महिलेवर कसा बलात्कार झाला आणि कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाला. बिल्किस बानो यांनी भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध कसा लढा दिला आणि विजय मिळवला. ही कथा माणुसकी म्हणून तुम्ही लोकांसमोर मांडाल का?” यावर कंगना उत्तर देत म्हणाली, “मला या कथेवर काम करायचं आहे, माझ्याकडे स्क्रिप्टही तयार आहे. मी यावर खूप संशोधन केलं आहे आणि तीन वर्षे त्यावर काम केलं आहे. ‘नेटफ्लिक्स’ आणि ‘ॲमेझॉन प्राइम’ व्यतिरिक्त मी ‘जिओ सिनेमा’लाही स्क्रिप्ट दाखवली होती. ‘नेटफ्लिक्स’ आणि ‘ॲमेझॉन प्राइम’ यांनी त्यांना हा चित्रपट राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगून नकार दिला आणि त्यांना राजकीय विषयांवर चित्रपट बनवण्यास मनाई करण्यात आली आहे. तर जिओ सिनेमाने म्हटलं आहे की आम्ही कंगनाबरोबर काम करत नाही, कारण ती भाजपला पाठिंबा देते आणि झी विलीनीकरणाकडे जात आहे. त्यामुळे आता माझ्याकडे कोणतेही पर्याय शिल्लक नाहीत.”



## 'मेरी ख्रिसमस'ने घातला दंगा!

कतरिना कैफचा 'मेरी ख्रिसमस' हा या वर्षातील बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी एक होता. प्रेक्षक खूप दिवसांपासून या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत होते. आता अखेर 12 जानेवारी रोजी 'मेरी ख्रिसमस' सिनेमा प्रदर्शित झाला आहे. आता या चित्रपटाला समीक्षक आणि प्रेक्षकांचा संमिश्र प्रतिसाद मिळत आहे. आता या सिनेमाचा फर्स्ट डे फर्स्ट शो संपला आहे. त्यानंतर प्रेक्षक आणि समीक्षकांनी या चित्रपटाचा रिव्ह्यू सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर करण्यास सुरुवात केली आहे. नेटकऱ्यांना 'मेरी ख्रिसमस' खुपच आवडला आहे. चित्रपटातील कतरिना कैफ आणि विजय सेतुपती यांच्या भूमिकेने प्रेक्षकांना खुपच आकर्षित केले आहे. तर अनेकांनी श्रीराम राघवन यांच्या दिग्दर्शनाचे कौतुक केले आहे. श्रीराम राघवन दिग्दर्शित या चित्रपटाला तरण आदर्शने साडे तीन स्टार दिले आहे. त्यांनी 'मेरी ख्रिसमस' हा 'उत्तम आणि मनोरंजक' चित्रपट असल्याचे सांगितले आहे. 'मेरी ख्रिसमस'मध्ये अनेक रोमांचक दृश्ये आणि उत्कृष्ट ट्विस्ट आणि टर्न असल्याचे ते म्हणाले आहे विजय सेतुपतीच्या अप्रतिम अभिनयासोबत कतरिना कैफने देखील बाजी मारली आहे. हा चित्रपट हिंदी आणि तमिळ भाषेत प्रदर्शित झाला असून सर्वांनाच सिनेमा खुपच आवडला आहे. एका नेटकऱ्याने लिहिले की, "मेरी ख्रिसमस पहिल्या भागात संथ आहे मात्र चित्रपट खूपच आनंददायक आहे." दुसऱ्या भागात आमच्यासाठी काय नवीन केले आहे हे पाहण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत" तर दुसऱ्याने लिहिले की, "विजय सेतुपती आणि कतरिना कैफ स्टारर हा एक स्मार्ट, मनोरंजक चित्रपट आहे." एका प्रेक्षकाने लिहिले, "मेरी ख्रिसमसची सुरुवात संथपणे होते परंतु उत्तरार्धात त्याचा वेग वाढतो आणि ट्विस्ट तुम्हाला धक्काच देतो.



## शाहिद अन् क्रिती घेऊन आलेय 'लाल पीली अखियां'!

बॉलिवूड अभिनेता शाहिद कपूर आणि अभिनेत्री क्रिती सेनन हे सध्या त्याच्या आगामी सिनेमामुळे चर्चेत आहे. ही जोडी पहिल्यांदाच या चित्रपटात एकत्र दिसणार आहे. दोघेही या रोमँटिक चित्रपटात रोमान्स करताना दिसणार आहेत. शाहिद कपूर अन् क्रितीच्या आगामी रोमँटिक-कॉमेडी चित्रपटाचे नाव 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' आहे. गेल्या वर्षी, 9 एप्रिलला शाहिद कपूरने सोशल मीडियावर त्याच्या आणि क्रिती सेननच्या रोमँटिक चित्रपटाचा फर्स्ट लुक पोस्टर शेअर केला होता. आता काही दिवसांपुर्वीच या चित्रपटाचे नाव आणि रिलिज डेटही समोर आली. आता या चित्रपटातील पहिले गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. आता 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया'चे पहिले गाणे 'लाल पीली अखियां' रिलीज झाले आहे, ज्यामध्ये शाहिद आणि क्रिती जबरदस्त डान्स करताना दिसत आहे. क्रिती आणि शाहिदच्या केमिस्ट्रीचे नेटकऱ्यांनी भरभरून प्रेम दिले आहे. नीरज राजावत यांनी या गाण्याचे बोल लिहिले आहेत तर 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' या गाण्याला तनिष्क बागचीने आवाज दिला आहे. सध्या हे गाणे सोशल मिडियावर व्हायरल झाले आहे. क्रिती आणि शाहिदचा हा सिनेमा व्हॅलेंटाईन वीकमध्ये रिलिज होणार आहे.

# सूर्यकुमार पुनरागमन करणार!

## सूर्यकुमारने आयपीएल 2024 पूर्वी नेटमध्ये सराव सुरू

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**दुखापतीने त्रस्त असलेल्या सूर्यकुमार यादवने आयपीएल २०२४ पूर्वी नेटमध्ये सराव सुरू केला आहे. सूर्याने शुक्रवारी त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडिओ शेअर केला. ज्यामध्ये तो नेटमध्ये जोरदार फलंदाजी करताना दिसला. व्हिडिओ पाहिल्यानंतर, असे दिसते की सूर्यकुमार त्याच्या दुखापतीतून बरा झाला आहे आणि आगामी आयपीएल २०२४ मध्ये पुनरागमन करण्यासाठी सज्ज आहे.**



अलीकडेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० सामन्यात सूर्यकुमार यादव दुखापतीचा बळी ठरला होता. त्यामुळे सूर्यकुमार यादव भारत-अफगाणिस्तान मालिकेत सहभागी होणार नाही. उल्लेखनीय आहे की सूर्यकुमार यादव आयसीसी टी-२० क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. याशिवाय टी-२० फॉरमॅटमध्ये सूर्यकुमार यादवची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे. मिस्टर ३६० डिग्रीने ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारतीय संघाचे नेतृत्व केले होते. त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा ४-१ असा पराभव केला. त्यांचे सध्या एनसीएमध्ये तो त्याच्या तंदुरुस्तीवर भर देत आहे. आता सूर्या अफगाणिस्तान भारत विरुद्ध अफगाणिस्तान विरुद्धच्या घरच्या टी-२० मालिकेतूनही बाहेर आहे. याबरोबरच त्याला स्पोर्ट्स हर्नियाचाही त्रास आहे, त्यासाठी त्याची त्यावर शस्त्रक्रिया देखील झाली आहे. अशा परिस्थितीत तो काही काळ मैदानापासून दूर राहणार आहे. आता सूर्याचे आयपीएल २०२४ मध्ये पुनरागमन अपेक्षित आहे. पायाच्या दुखापतीच्या पुनर्वसन दरम्यान सूर्याने आता त्याच्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो फलंदाजी करताना दिसत आहे. सूर्याच्या या व्हिडिओमुळे चाहत्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सूर्याच्या लवकरच पुनरागमनाची आशा चाहत्यांनी व्यक्त करत आनंद व्यक्त केला आहे. सूर्या या वर्षी जूनमध्ये कॅरेबियन भूमीत आणि अमेरिकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषक संघाचा महत्त्वाचा भाग आहे. भारताच्या कर्णधारावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशा परिस्थितीत आता रोहित शर्माने जवळपास वर्षभरानंतर टी-२० फॉरमॅटमध्ये पुनरागमन केले आहे. रोहित शर्माच्या पुनरागमनानंतर आता त्याच्याकडून विश्वचषकाचे नेतृत्व अपेक्षित आहे. दरम्यान, ऋषभ पंत मैदानाबाहेर गेल्यानंतरही यष्टीरक्षकावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता सूर्या कधी मैदानात परततो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. टीम इंडियाने तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. अशा परिस्थितीत मालिकेतील दुसरा सामना इंदोरमध्ये खेळवला जाणार आहे. या सामन्यात सर्वांच्या नजरा विराट कोहलीवर असतील, जो वैयक्तिक कारणांमुळे पहिला टी-२० सामना खेळू शकला नाही आणि त्यामुळे कोहली वर्ल्ड कप २०२२ नंतर थेट या छोट्या फॉरमॅटमध्ये खेळताना दिसणार आहे. पायाच्या दुखापतीच्या पुनर्वसन दरम्यान सूर्याने आता त्याच्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो फलंदाजी करताना दिसत आहे. सूर्याच्या या व्हिडिओमुळे चाहत्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सूर्याच्या लवकरच पुनरागमनाची आशा चाहत्यांनी व्यक्त करत आनंद व्यक्त केला आहे. सूर्या या वर्षी जूनमध्ये कॅरेबियन भूमीत आणि अमेरिकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषक संघाचा महत्त्वाचा भाग आहे. भारताच्या कर्णधारावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशा परिस्थितीत आता रोहित शर्माने जवळपास वर्षभरानंतर टी-२० फॉरमॅटमध्ये पुनरागमन केले आहे.दुखापतीने त्रस्त असलेल्या सूर्यकुमार यादवने आयपीएल २०२४ पूर्वी नेटमध्ये सराव सुरू केला आहे.

### सूर्याची पुनरागमनाची आशा

रोहित शर्माच्या पुनरागमनानंतर आता त्याच्याकडून विश्वचषकाचे नेतृत्व अपेक्षित आहे. दरम्यान, ऋषभ पंत मैदानाबाहेर गेल्यानंतरही यष्टीरक्षकावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता सूर्या कधी मैदानात परततो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. टीम इंडियाने तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. अशा परिस्थितीत मालिकेतील दुसरा सामना इंदोरमध्ये खेळवला जाणार आहे. या सामन्यात सर्वांच्या नजरा विराट कोहलीवर असतील, जो वैयक्तिक कारणांमुळे पहिला टी-२० सामना खेळू शकला नाही आणि त्यामुळे कोहली वर्ल्ड कप २०२२ नंतर थेट या छोट्या फॉरमॅटमध्ये खेळताना दिसणार आहे. पायाच्या दुखापतीच्या पुनर्वसन दरम्यान सूर्याने आता त्याच्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो फलंदाजी करताना दिसत आहे. सूर्याच्या या व्हिडिओमुळे चाहत्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सूर्याच्या लवकरच पुनरागमनाची आशा चाहत्यांनी व्यक्त करत आनंद व्यक्त केला आहे. सूर्या या वर्षी जूनमध्ये कॅरेबियन भूमीत आणि अमेरिकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषक संघाचा महत्त्वाचा भाग आहे. भारताच्या कर्णधारावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशा परिस्थितीत आता रोहित शर्माने जवळपास वर्षभरानंतर टी-२० फॉरमॅटमध्ये पुनरागमन केले आहे.

# टी-२०मध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा पहिला गोलंदाज!

## टीम साऊदी टी-20मध्ये 150 विकेट्स घेणारा पहिला गोलंदाज

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज टीम साऊदीने पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या टी-२०मध्ये एकूण ४ विकेट्स घेतल्या, यासह त्याने आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये १५० विकेट्सही पूर्ण केल्या. या छोट्या फॉरमॅटमध्ये १५० विकेट्स घेणारा टीम साऊदी जगातील पहिला गोलंदाज ठरला आहे.**




पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या टी-२० मध्ये टीम साऊदीने मोहम्मद रिझवान, इफ्तिखार अहमद, अब्बास आफ्रिदी आणि हारिस रौफ या चार फलंदाजांना बाद केले. साऊदीने ४ षटकात २५ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. तिसऱ्या विकेटसह, टीम साऊदीने १५० आंतरराष्ट्रीय टी-२० विकेट्स पूर्ण केल्या आणि हा आकडा गाठणारा पहिला गोलंदाज ठरला. हा त्याचा ११८वा टी-२० सामना होता. सौदीच्या नावावर आता १५१ टी-२० विकेट्स आहेत. टी-२० व्यतिरिक्त टीम साऊदीने वनडेमध्ये २२१ आणि कसोटीत ३७४ विकेट्स घेतल्या आहेत. न्यूझीलंड क्रिकेट संघाने पहिल्या टी-२० सामन्यात पाकिस्तानचा ४६ धावांनी पराभव केला. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. केन विल्यमसन आणि डॅरिल मिचेलच्या अर्धशतकांमुळे न्यूझीलंडला २०० हून अधिक धावा करता आल्या. पाकिस्तानला विजयासाठी २२७ धावांचे लक्ष्य मिळाले होते, प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ १८० धावांत गारद झाला. न्यूझीलंडने पाच सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजीला आलेल्या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली, दुसऱ्याच चेंडूवर डेव्हॉन कॉनवे शाहीन आफ्रिदीकडे बाद झाला. मात्र, तिसऱ्याच षटकात फिन ॲलनने शाहीन आफ्रिदीला २४ धावांवर त्रिफळाचीत करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. ॲलनने १५ चेंडूत ३ षटकार आणि तब्बल ३ चौकारांच्या मदतीने ३४ धावा केल्या. कर्णधार केन विल्यमसनने ४२ चेंडूत ५७ धावांची खेळी केली. डॅरिल मिचेलने २७ चेंडूत ६१ धावांची शानदार खेळी केली, ज्यात त्याने ४ षटकार आणि ४ चौकार लगावले. मार्क चॅपमनने शेवटच्या षटकांमध्ये ११ चेंडूत २ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने २६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. पाकिस्तानकडून शाहीन आफ्रिदी आणि अब्बास आफ्रिदी यांनी सर्वाधिक विकेट घेतल्या.

### डॅरिल मिचेल सामनावीर ठरला

सैम अयुब आणि मोहम्मद रिझवान यांनी धमाकेदार डावाची सुरुवात केली, मात्र तिसऱ्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर अयुबचा डाव संपुष्टात आला. त्याने ८ चेंडूत २७ धावा केल्या, ज्यात त्याने २ चौकार आणि ३ षटकार मारले. यानंतर रिझवान आणि बाबर आझमने डाव पुढे नेला, रिझवान १४ चेंडूत २५ धावा करून बाद झाला.